Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near Balchitrawani, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२-ए,
फा.प्लॉ.नं.१७८, १७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा. मं./परीक्षा–३/2836
पुणे ४११००४
दिनांक – ०९/०६/२०२३

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील निकालपूर्वीच्या व निकालानंतरच्या दुरुस्त्यांच्या सुधारित दंडात्मक शुल्काबाबत.

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील निकालपूर्वीच्या व निकालानंतरच्या दुरुस्ती प्रकरणी सुधारित दंडात्मक शुल्काबाबतचा विषय दिनांक १४/१०/२०२२ रोजीच्या कार्यकारी परिषदेसमोर सादर करण्यात आला असता त्याबाबत खालीलप्रमाणे ठराव संमत झाला आहे.

विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रेतील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून ऑनलाइन प्रिलिस्टमधील विद्यार्थ्यांचे नांव, वडिलांचे नांव, आडनाव, आईचे नांव, विषय, माध्यम, विषय सूट, इत्यादीच्या दुरुस्त्या मोठया प्रमाणात मंडळास प्राप्त होतात. राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा–३/८३४२ दि. २७/१२/२०१३ मध्ये नमूद केल्यानुसार विहीत शुल्क आकारुन सदरच्या दुरुस्त्या करुन देण्यात येतात. याबाबत नाशिक व औरंगाबाद विभागीय मंडळाकडून दुरुस्ती शुल्कात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला होता. सदर दुरुस्तीच्या प्रस्तावांसाठी खालीलप्रमाणे दुरुस्ती शुल्कात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव मंजूर झाला आहे.

निकालापूर्वीच्या व निकालानंतरच्या दुरुस्तीसाठी दुरुस्ती शुल्क खालीलप्रमाणे आहे –.

अ) निकालापूर्वीच्या दुरुस्त्यांबाबत

| अ.क्र | दुरूस्तीबाबतचा तपशील | दुरूस्ती शुल्क |
|---|---|---|
| १ | नावातील दुरुस्ती (फक्त नाव / वडिलांचेनांव / आडनाव यापैकी काहीही एक) | रू.२००/- प्रती दुरुस्ती |
| २ | संपूर्ण नावातील दुरूस्ती (नांव, आडनांव, वडिलांचे नांव) | रू.२००/- प्रती विदयार्थी |
| 3. | आईच्या नावातील दुरूस्ती | रू.२००/- प्रती विदयार्थी |
| ४ | आवेदनपत्रातील प्रत्येक दुरूस्तीसाठी(विषय/माध्यम वगळून) जन्मठिकाण/जन्म दिनांक | रू.२००/- प्रती दुरूस्ती |
| ५ | विषय दुरूस्ती / विषय सूट दुरूस्ती | रू.२००/- प्रती विषय |
| ६ | संपूर्ण विषयांची दुरूस्ती | रू.१०००/- प्रती विदयार्थी |
| ७ | संपूर्ण विषयांच्या माध्यमाची दुरूस्ती | रू.१०००/- प्रती विदयार्थी |
| ८ | आवेदनपत्र चुकीचे पाठविणे | रू.१०००/- प्रती विदयार्थी |
| ९ | एका विषयाच्या माध्यमातील दुरूस्ती | रू.२००/- प्रती विषय |
| १० | प्रिलिस्ट विहीत मुदतीनंतर पाठविणे | रू.२००/- प्रति दिन |

ब) निकालाच्या तारखेपासून गणकयंत्र विभागास प्रमाणपत्राच्या दुरूस्त्या कळविण्यापर्यंत (निकाल प्रसिध्द झाल्यापासून ६ महिन्यांपर्यंत)

| अ.क्र | दुरूस्तीबाबतचा तपशील | दुरूस्ती शुल्क |
|---|---|---|
| १ | श्रेणी, प्रात्यक्षिक, मौखिक, अंतर्गत मूल्यमापन इ.गुण / श्रेणी निकालानंतर सादर करणे | रू.२००/- प्रतीदिन |
| २ | गुणतक्ते चुकीचे सादर करणे | रू.२००/- प्रती गुण यादी |
| 3. | विषय सूट, श्रेणी दुरूस्ती, विषय बदल, प्रात्यक्षिक / मौखिक गुण अंतर्गत मूल्यमापनाचे गुण यामधील कोणत्याही तरतुदीच्या दुरूस्तीसाठी प्रती तरतूद | रू.२०००/- (शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयास दंड) |
| ४ | गुणपत्रिकेतील प्रत्येक दुरूस्तीसाठी (विद्यार्थ्यांचे नाव /वडिलांचे नाव / आडनाव / जन्मदिनांक /जन्मठिकाण / आईचे नाव यामधील कोणत्याही तरतुदीच्या दुरुस्तीसाठी प्रती तरतूद ) | रू.२००/- प्रती चूक |
| ५ | अ)गुणपत्रक लॅमिनेशनसह नवीन देणे<br>ब)प्रमाणपत्र लॅमिनेशनसह नवीन देणे | रू.२००/-<br>रू.२००/- |

तरी उपरोक्त ठरावाची नोंद घेऊन जुलै–ऑगस्ट २०२३ च्या परीक्षेपासून प्रस्तावित दुरूस्ती शुल्कानुसार शुल्क आकारूनच दुरूस्तीचे प्रस्ताव स्विकारण्यात यावे व यथानियम कार्यवाही करावी.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्य मंडळ, पुणे – ४

प्रत माहितीस्तव :–
१ लेखा शाखा, राज्य मंडळ, पुणे–०४.
२ गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे–०४.

क्र.नाविमं/माध्य.ब-१/
नाशिक ४२२००३
दि.०४/०७/२०२३

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार

उपरोक्त राज्यमंडळाच्या पत्रानुसार कळविण्यात येते कि, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेतील निकालापुर्वीच्या व निकालानंतरच्या दुरुस्त्यांच्या सुधारित दंडात्मक शुल्कानुसार शुल्क आकारूनच दुरुस्तीचे प्रस्ताव स्वीकारण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

(संगीता शिंदे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिकशिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक ४२२००३